भिवंडी वाहतूक उपविभाग हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ९२ /२०२६ दि. २३/०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, भिवंडी निजामपुरा महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **भिवंडी** वाहतूक उपविभागाचे हददीत महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने दि. १४/०१/२०२६ रोजी मतपेटया **१) गाजेंगी हॉल, २) टावरे किडा संकुल, ३)फरहान हॉल** येथून भिवंडी शहरात व आसपासचे परीसरात असणाऱ्या मतदान केंद्राकरीता वितरीत केल्या जाणार आहेत. तसेच दि. १५/०१/२०२६ रोजी मतदान प्रक्रीया पार पडल्यानंतर मतपेटया पुन्हा **१) गाजेंगी हॉल, २) टावरे किडा संकुल, ३)फरहान हॉल** येथे जमा करण्यात येवुन दि.१६/०१/२०२६ रोजी सदर ठिकाणी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे सदर तिन्ही दिवशी **१) गाजेंगी हॉल, २) टावरे किडा संकुल व ३) फरहान हॉल या परिसरात** वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे. परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

१) गाजेंगी हॉल, कोंबडपाडा, भिवंडी करीता

प्रवेश बंद –	१) आदर्श पार्क कडून कोळेकर चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नाना नानी पार्क** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व प्रकारची वाहने गाजेंगी हॉलकडे न येता खाडीपार रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) कोंबडपाडा कडुन गाजेंगी हॉल कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कोडवाडा कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर सर्व प्रकारची वाहने कोंडवाडा कट येथुन उजवे वळण घेवुन कोळेकर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	३) खोणी गाव कडुन गाजेंगी हॉल कडै येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सिध्दार्थ नगर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर सर्व प्रकारची वाहने खोणी गाव ते मीठपाडा रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	गाजेंगी हॉल परिसरातील रस्त्यांचे दरम्यान दोन्ही बाजुस **'नो पार्किंग'** करण्यात येत आहे.

२) टावरे किडा संकुल, भिवंडी करीता

प्रवेश बंद –	१) बी.एस.एन.एल. ऑफीस कट येथुन टावरे स्टेडियम कडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना **बी.एस.एन. एल. ऑफीस कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व प्रकारची वाहने बी.एस.एन.एल. ऑफीस कट येथुन गौरीपाडा, केशरबाग मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) इदगाह रोड येथुन टावरे स्टेडियम कडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना **साहिल हॉटेल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर सर्व प्रकारची वाहने साहिल हॉटेल येथुन डावे वळण घेवुन इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	साहिल हॉटेल ते बी.एस.एन.एल. ऑफीस कट दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजुस **'नो पार्किंग'** करण्यात येत आहे.

३) फरहान हॉल, मिल्लत नगर, भिवंडी करीता

प्रवेश बंद –	१) ममता हॉस्पीटल येथुन फरहान हॉल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ममता हॉस्पीटल कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
प्रवेश बंद –	२) बारक्या कंम्पाउंड कडुन अल नुर हायस्कुल कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खालीद शेठ यांचे बिल्डींग जवळ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने मेट्रो हॉटेल येथुन वंजारपट्टीनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद –	३) अजवा हॉटेल येथुन अल नुर हायस्कुल मार्गे फरहान हॉल कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अल नुर हायस्कुल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व वाहने अजवा हॉटेल मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	गाजेंगी हॉल परिसरातील रस्त्यांचे दरम्यान दोन्ही बाजुस **'नो पार्किंग'** करण्यात येत आहे.

सदर अधिसूचना **दिनांक १४/०१/२०२६ रोजी सकाळी ०५:०० वाजेपासुन ते दिनांक १६/०१/२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रीया पुर्ण पर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.